# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जा.क्र.:कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२२ दि.८ मार्च,२०२२

जळगाव दि.८(प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या योग मार्गदर्शन केंद्रातर्फे ८ मार्चच्या जागतिक महिला दिनानिमित्त महिलांसाठी योगा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यंदा महिला दिनाची थिम ‘ मजबुत भविष्यासाठी लैंगिक समानता गरजेची आहे’ अशी होती. त्यामुळे योगा वुईथ फन या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. पचनसंस्था, श्वसनसंस्था, मज्जासंस्था व हार्मोलन संतुलन यामुळे साधले जाते. यावेळी ताडासन, भुजंगासन, मलासन, कोलांट ऊडी, अंगुष्ठपाद,संचालनासन आदीची प्रात्यक्षिके घेण्यात आली. यावेळी शिक्षणशास्त्र विभाग प्रमुख डॉ.मनिषा इंदाणी, योग केंद्राचे प्रमुख इंजि.राजेश पाटील उपस्थित होते. डॉ. लिना चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली ८० महिलांनी भाग घेतला. त्यामध्ये विद्यार्थीनी, उमवि परीसरातील महिला, शिक्षक व महिला कर्मचारी सहभागी होत्या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी यशवंत गरूड, हिमंत जाधव, सुनील चव्हाण, भिकन पाटील, रत्नाकर सोनार, युवराज मोतिराया व भगवान साळुंखे यांनी सहकार्य केले.

---

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

उपरोक्त बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी